RNI No. MAHBIL/2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ७, अंक १] गुरुवार, जानेवारी ७, २०२१/पौष १७, शके १९४२ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ जानेवारी २०२१

### अधिसूचना

**प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगांस प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, २००९.**

क्रमांक संकिर्ण-२०२०/प्र.क्र.५३/पदुम.-४.——ज्याअर्थी, प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगांस प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, २००९ (सन २००९ चा अधिनियम क्रमांक २७) याच्या कलम ६ ची पोट-कलमे (१) आणि (२) तसेच, कलमे ७, ११, १२ आणि १३ यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने, शासन अधिसूचना, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग, क्रमांक संकिर्ण-२०२०/प्र. क्र. ५३/पदुम-४, दिनांक २१ सप्टेंबर २०२० (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) आणि अधिसूचना दिनांक १० नोव्हेंबर २०२० द्वारे जो उक्त अधिनियमान्वये अनुसूचित रोग असल्याचे घोषित केले आहे, त्या लंपी चर्मरोगाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्यातील अकोला, अमरावती, औरंगाबाद, अहमदनगर, भंडारा, बुलडाणा, बीड, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, हिंगोली, जालना, लातूर, नांदेड, नागपूर, उस्मानाबाद, परभणी, सोलापूर, वर्धा, वाशिम, यवतमाळ, सांगली व सातारा या जिल्ह्यांचे संपूर्ण क्षेत्र " नियंत्रित क्षेत्र " म्हणून घोषित केले आहे ;

आणि ज्याअर्थी, पुणे, रत्नागिरी व नाशिक जिल्ह्यांच्या क्षेत्रात गोजातीय प्रजातीच्या प्राण्यांना लंपी चर्मरोगाचा प्रादुर्भाव झाल्याचे निदर्शनास आले आहे आणि म्हणून, उक्त पुणे, रत्नागिरी व नाशिक जिल्ह्यांचे क्षेत्र " नियंत्रित क्षेत्र " म्हणून घोषित करणे शासनास इष्ट वाटते ;

त्याअर्थी, आता, प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगांस प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, २००९ ( सन २००९ चा अधिनियम क्रमांक २७ ) याच्या कलम ६ ची पोट- कलमे (१) आणि (२) तसेच, कलमे ७, ११, १२ आणि १३ यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या

अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे शासन अधिसूचना, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग क्रमांक संकिर्ण- २०२०/प्र. क्र. ५३/पदुम.- ४, दिनांक २१ सप्टेंबर २०२० मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त अधिसूचनेत, प्रास्ताविकेत, “ व सातारा ” या मजकुराऐवजी “ सातारा, पुणे, रत्नागिरी व नाशिक ” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अनूप कुमार,**
शासनाचे प्रधान सचिव.

## AGRICULTURE, ANIMAL HUSBANDRY, DAIRY DEVELOPMENT AND FISHERIES DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 4th January 2021

*NOTIFICATION*

PREVENTION AND CONTROL OF CONTAGIOUS DISEASES IN ANIMALS ACT, 2009.

No. Sankirna-2020/CR-53/ADF-4.—Whereas as, the Government of Maharashtra has, by Government Notification, Agriculture, Animal Husbandry, Dairy Development and Fisheries Department, No. Sankirna-2020/C.R. 53/ADF-4, dated the 21st September, 2020 (hereinafter referred to " the said notification "), and Notification dated the 10th November, 2020 issued in exercise of the powers conferred by sub-sections *(1)* and *(2)* of section 6 read with sections 7, 11, 12 and 13 of the Prevention and Control of Infectious and Contagious Diseases in Animals Act, 2009 (No.27 of 2009), declared the Districts Akola, Amravati, Aurangabad, Ahmednagar, Bhandara, Buldhana, Beed, Chandrapur, Gadchiroli, Gondia, Hingoli, Jalna, Latur, Nanded, Nagpur, Osmanabad, Parbhani, Solapur, Wardha, Washim, Yavatmal, Sangali and Satara of the State of Maharashtra as a " controlled area " in respect of the " Lumpy Skin Disease " which is a scheduled disease declared under the said Act ;

And whereas, it is noticed that, in the area of Districts Pune, Ratnagiri and Nashik the Bovine species animals are infected with the Lumpy Skin disease, and therefore, the Government considers it expedient to declare the said Districts Pune, Ratnagiri and Nashik as a " controlled area";

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections *(1)* and *(2)* of section 6 read with sections 7, 11, 12 and 13 of the Prevention and Control of Infectious and Contagious Diseases in Animals Act, 2009 (No.27 of 2009), the Government of Maharashtra hereby amends the Government Notification, Agriculture, Animal Husbandry, Dairy Development and Fisheries Department, No. Sankirna-2020/C.R. 53 /ADF-4, dated the 21st September, 2020, as follows, namely :–

In the said Notification, in the preamble, for the words " and Satara " the words " Satara, Pune, Ratnagiri and Nashik " shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ANOOP KUMAR,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.